I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 286-291
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# व्यावसायिक सामाजिक दायित्वाचे आरोग्य क्षेत्रातील योगदान

प्रा. दिगंबर भऊरावजी टुले

सहा.प्राध्यापक
तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश :**

ग्रामिण आरोग्यच्या सोई सुविधा तयार करणे, त्यांना स्थानिक पातळीवर शहरी आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्या, कुपोषण नाहिसे व्हावे, स्वच्छता, औषोधपचार, या करीता केंद्र आणि राज्य सरकार मोठया प्रमाणावर काम करीत आहे. आरोग्य सोई सुविधा ग्रामिण क्षेत्रात वाढाव्या या करीता व्यवसायाचे सामाजिक जबाबदारीचे आरोग्य उपक्रमकाम करीत आहे.कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३५ नूसार प्रत्येक उद्योगांना सामाजिक योगदान कायदयाने बंधन कारक केलेले आहे. ज्या उद्योंगाची किमान तीन वर्षाचे सरासरी उत्पन्न ५०० करोड आहे किंवा ज्यांची एकुण वर्थ १००० करोड आहे त्याना सामाजिक दायित्वासाठी किमान २ टक्के निधी एका आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन लेखात व्यवसायिक सामाजिक जबाबदारीचा आरोग्य उपक्रमाचा ग्रामिण आरोग्य सेवेतील योगादानाचे महत्व आणि परिणामाची मांडणी करणार आहे.

**बीजशब्द :** व्यवसायिक सामाजिक जबाबदारी, ग्रामिण आरोग्य सुविधा.

**प्रस्तावना :**

व्यवासायिक सामाजिक दायित्व ही व्यवसायाची जबाबदारी निश्चित २०१३ च्या कंपनी कायदयानूसार करण्यात आलेली आहे. भारतासारख्या बहुसंख्य अती गरिबी, भुक निर्देशांक खालावलेल्या, शिक्षणात गळती असने, औषधउपचार कमी मिळणे इत्यादी समस्यांनी ग्रस्त असणाऱ्या देशात व्यावसायाची सामाजिक जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. व्यावसायाने सुध्दा आपले भागधारक, कर्मचारी आणि स्थानिक समुदायाप्रती जबाबदारी घेणे आवश्यक आहे, भारतात बहुसंख्यकाकडे संपत्तीत कमी तर कमी लोकांकडे संपत्तीचे गठन दिवसागणिक वाढत आहे. आज व्यावस्थापनात सामाजिक जबाबदारी प्रती काळजी आहे आणि त्या करिता स्थानिकांना सोबत घेण्याचा, ग्राहकांना लक्ष करणे, ब्रॅड इमेज तयार करणे तसेच कायदयाचे पालन होने आवश्यक आहे. आजचे व्यवसाय जास्तित जास्त नफा कमाविने, उपलब्ध संसाधनांचा जास्तित जास्त वापर करण्यावर भर देतात आणि नफा मिळवितात. स्थानिक शासन, राज्य आणि राष्ट्रिय नियमांचे पालन करून हा व्यावहार होने अपेक्षित आहे. नफा मिळविण्या सोबत सामाजिक जबाबदारी कंपनी कायदा २०१३ नुसार पालन करणे आवश्यक आहे. भारत सरकारने कायदयाच्या माध्यमातुन कार्यक्रमाची किंवा उपक्रमाची यादी जाहिर केलेली आहे. कायदयानुसार ज्या व्यावसायाचा निव्वळ नफा ५०० करोड किंवा वर्थ १००० करोड आहे त्यांना निव्वळ नफ्यच्या तिन वर्षाच्या सरासरीच्या २ टक्के इतका निधी खर्च करणे अपेक्षित आहे.

**सी.एस.आर. अंमंलबजावणीतल काही मुद्दे :**

१. स्थानिकांचा अल्प सहभाग : स्थानिकाचा सिएसआर अंमंलबजावणीत योग्य सहभाग नसने याचा उपक्रमाचा सफल होन्यावर मोठा परिणाम पडतो. जर व्यावस्थापनाच्या सिएसआर अंमंलबजावणीत स्थानिकांचा सहभाग नसेल तर उपक्रमाच्या यशस्वी होण्यात अडचणी निर्माण होतात.

२. स्थानिकांच्या गरजा ओळखुन कार्यक्रमाची आखनी केल्या जात नाही. : स्थानिकाच्या गरजा ओळखुन कार्यक्रमाची आखनी करणे आवश्यक आहे, पण बऱ्याचदा व्यावस्थापण स्थानिकांच्या गरजेचा विचार न करता व्यावस्थापण ठरवेल त्या बाबिंवर खर्च करून कार्यक्रमाची आखनी केली जाते

३. व्यावहारात पारदर्शकता नसने : स्थानिक पातळिवर अंमलबजावणी करतांना लोकसहभाग घेउन निधीचे योग्य वाटप, उपक्रम ठरविणे, लोकसहभाग घेणे, व्यावहारात पारदर्शकता नसने इत्यादी मुद्दे आहेत.

४. सामाजिक अंकेक्षणाचा अभाव :— सामाजिक अंकेक्षण सर्व प्रकारच्या कार्यक्रमाचे होने आवश्यक आहे, उपक्रमाच्या आखनी पासून तर अमंलबजावणी पर्यन्त सामाजिक संहभाग घेणे आवश्यक आहे, पण कायद्याने सामाजिक अंकेक्षण सक्तीचे नाही. (fiinovation.co.in, 2021)

**ग्रामिण आरोग्य स्थिती :**

आरोग्य ही संकल्पना व्यापक असून यात विविध मनोसामाजिक घटकांचा समावेश होतो. व्यक्तीचे आरोग्य, कुटुंब आणि समाज वा समुदायाच्या आरोग्याचा यात समावेश होतो. कोविड १९ च्या काळात आरोग्य ही स्थिती वैयक्तिक, कौटुंबिक, सामुहिक, राज्य, देश आणि जागतिक पातळीवर बघितल्या गेली. सार्वजनिक आरोग्य संकल्पनेमध्ये मैला व कचरा नष्ट करण्याची जबाबदारी, शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय, रस्ता सुलभिकरण, घरात खेळती हवा, आरोग्यास पोषक वातावरण याचा समावेश होतो.

प्राथमिक आरोग्यसेवा सुलभ रित्या दुर्गम जनतेपर्यंन्त पोहचविणे, माता आणि अभ्रक मृत्युदर कमी करणे आणि त्या करीता त्यांचे आरोग्य सुधारणे, पायाभूत सेवा आणि सुविधासाठी आरोग्य इस्पितळ उभारण्यासाठी प्रयत्न करणे, आरोग्य सेवेचा दर्जा राखण्यासाठी डॉक्टर, आणि इतर कर्मचारी यांचे कौशल्य विकास करण्याचा प्रयत्न करणे, आरोग्य सेवा अद्यावत करणे, इमारती दुरूस्ती आणि बांधकाम करणे, राष्ट्रीय योजना राबविने, समाजाचे ज्ञान, आरोग्य, दृष्ट्रिकोण, वर्तवणुक सुधारण्यासाठी प्रयत्न करणे हे उद्देश महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे आहे.(https://arogya.maharashtra.gov.in, 2021)

डेबोराह हेनेशी आणि गेराल्डाईन यांच्या मते, 'आरोग्य म्हणजे व्यक्तिच्या वैयक्तिक जीवनातील भावनात्मक, मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि आध्यात्मिक बाजूंमधील संतुलनाची वा एक्याची स्थिती म्हणजे आरोग्य होय.'

**जागतीक आरोग्य संघटना–** आरोग्य म्हणजे व्यक्तिची सामाजिक, मानसिक व शारीरिक सुस्थिती होय.

**व्यवसायिक सामाजिक दायित्व आणि ग्रामिण आरोग्यासाठी उपाययोजना.**

व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून ग्रामिण आरोग्य सुधारणेसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

कुपोषण कार्यक्रम : पोषण आहार, आरोग्य निगा, शाळा पुर्व शिक्षण, किशोरावस्थेतील मुली, गरोधर महिला, स्तनदा महिला यांचा विचार कुपोषणाचा विचार करतांना करावा लागतो. कुपोषण निर्मुलणाचे उद्देशामध्ये आरोग्य आणि पोषणाचा दर्जा वृध्दिंगत करणे, संतुलित मानसिक, शारीरिक आणि सामाजिक विकासाचा दर्जा तयार करणे, लहान बालकांचा मृत्युदर कमी करणे, कुपोषण आणि शाळा बाह्य प्रतिबंध करणे, मातांना आरोग्य सुविधा आणि पोषण आहार, मुल्यांची माहिती देने, तसेच मातांना पौष्टिक आहाराची व्यवस्था करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. (womenchild.maharashtra.gov.in, 2021)

'महिला आणि बाल विकास विभाग आणि जे एस डब्लु फाउंडेशन' यांचे जव्हार, जिल्हा पालघर मधील अंगणवाडयांमधील बालकांच्या कुपोषणाची समस्या हाताळणे/ सुदृढ भारत अभियान राबविण्यात आले. नि:शुल्क जेवण देउन वाढीस प्रोत्साहन देणे, पाणलोट क्षेत्राचा विकास आणि शेती आधारीत उत्पादनकत्व वाढवून जगण्याचा आणि अन्न सुरक्षेच्या प्रश्नाचे दीर्घकालीन समाधान करणे, दीर्घकालीन संस्थात्मक सक्षमीकरण प्रक्रिया राबविणे याबाबींचा समावेश करण्यात आला आहे. (womenchild.maharashtra.gov.in, 2021)

**रोग निदान शिबिरे : –** आरोग्य विषयक बहुसंख्य सुविधा शहरी समुदायातच उपलब्ध आहे तर ग्रामीण आणि आदिवासी समुदायात आजही आरोग्य सुविधांचा तुटवडा आहे. अशा आरोग्य सुविधेपासून वंचित समुदायासाठी आरोग्या च्या विविध सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून विविध सामाजिक संघटना, व्यवसायाचे सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम, सरकारी संस्था अशा प्रकारची आरोग्य शिबिरांचे आयोजन करीत असतात. यात प्रामुख्याने आरोग्य रोगनिदान शिबिर यात मधुमेह, छातीचे विविध विकार, रक्तदाब, अस्थमा, महारोगांचे निदान करून औषोधपाचार सुचविले जातात. तपासणी शिबिरांमध्ये डोळयांची तपासणी, दातांची तपासणी, कान, नाक व घसा तपासणी इत्यादी बाबींचा शिबिरात समावेश होतो. योग्य नंबरचे चष्मे, दातांवर उपचार, कान, नाक आणि घसा संदर्भातील उपचार तपासून सुचविले जातात किंवा काही वेळा उपचारही केले जातात. चष्मे, श्रवन यंत्र, दातांमध्ये चांदी किंवा इतर उपचार केले जातात. या सोबत बऱ्याचदा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करून वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याचा प्रयत्न केला जातो किंवा जनजागृती केली जाते. फिरते दवाखाने या प्रकारात सामाजिक संस्था किंवा व्यवसायिक उपक्रमाच्या माध्यमातून एक फिरते दावाखाने असून त्यातुन ग्रामीण जनतेची वारेवार तपासणी, औषोधपचार केला जातो. यामुळे बीमार पडन्याचे, वेळेत उपचार होण्याचे प्रमाण वाढले आहे. दुर्गम ग्रामीण वस्तींना या फिरत्या दवाखानाचा उत्तम उपयोग होतो.(कुलकर्णी,२००८)

साथरोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक आणि नियंत्रणात्मक उपाययोजना करणे, जिल्हास्तरीय आरोग्य यंत्रेनेला मार्गदर्शक सूचना देणे, पाणी गुणवत्ता नियंत्रण, ब्लिचिंग पावडर गुणवत्ता नियंत्रण, सामान्य जनतेचे आरोग्य शिक्षण, विविध विभागांशी समन्वय ठेवणे.

प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना यात आजार बळावण्याची शक्यता असणाऱ्या गावांना साथरोग प्रतिबंधात्मक कार्यवाहीची सूचना देणे, पाणी पुरवठयाच्या त्रुट्या दुरूस्त करणे, पाण्याची गुणवत्ता प्रयोग शाळांमार्फत तपासणे, औषधांचा साठा पुरविणे, साथरोग नियंत्रणासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे, उपचारासाठी रूग्णालये उपलब्ध करणे इत्यादी बाबी शासनाकडून करण्यात येतात. (https://arogya.maharashtra.gov.in, 2021)

व्यवसायिक सामाजिक दायित्वाचा निधीचा वापर आरोग्य उपक्रमासाठी मोठया प्रमाणावर करण्यात येतो. साधारणत:हा केंद्र शासनाच्या निर्दशनानूसार दायित्वाचा निधी खर्च करण्यात येतो. केंद्र शासनाच्या फ्लॅगशिप प्रोग्राम राबविणाऱ्या उपक्रमाला सरकार प्रोत्साहन देते. २०२० ते २०२१ या काळात केंद्र शासनाच्या दिशा निर्देशानूसार व्यवसायिक सामाजिक दायित्वाचा निधी आरोग्य सुविधेसाठी मोठया प्रमाणावर वळविण्यात आला. साथरोग नियंत्रणासाठी कोविड १९ प्रादुर्भाव कमी करण्यासाठी सामाजिक दायित्वाचा निधी सरकारांनी सरकारी साथरोग नियंत्रण, जनजागृती, लसीकरण इत्यादीसाठी वापरला. तसेच साथरोग नियंत्रणासाठी इंडस्ट्रिज स्वत: समोर येउन कर्मचारी, त्यांचे कौटुंबीय, स्थानिक समाज यांच्या साठी आरोग्य सेवा, ऑक्सिजन सुविधा, ट्रान्सपोर्ट सुविधा इत्यादीसाठी मदत केली. तसेच ज्या परिसरात इंडस्ट्रिज आहे त्या परिसरात अनेक आरोग्य विषयक कामे करण्यात आलेली आहे. यात समाज जनजागृती, मास्क वाटप आणि मास्क बनविण्याचे प्रशिक्षण, स्वच्छता मार्गदर्शन, समुपदेशन, विविध माध्यमांचा वापर करून समाज जागृती करण्यात आली आहे.

**संशोधन साहित्य पडताळा :**

१. वेदांन्तम लिला, 'रूग्णालयरतील व्यवसायिक सामाजिक दायित्व : अंतर्गत आणि बाहृय भागदारकांसाठी पारदर्शक उपक्रमांची आवश्यकता.'(२०१४), या संशोधन लेखात व्यवसायिक सामाजिक दायित्व हे हेल्थकेअर साठी आवश्यक आहे आणि या करिता व्यवसायाची जबाबदारी बाबत धोरण आवश्यक आहे, व्यवसायाचे सिएसआर धोरण भागधारक, कर्मचारी, ग्राहक, समुदायावर आधारीत असावी, या करिता फ्रेमवर्क तयार करयन कसर्य करणे आवश्यक आहे. सिएसआर च्या माध्यमातुन विविध उपक्रम जसे पोषन आहार, आरोग्यपुरक वातावरण निर्मिती करणे आवश्यक आहे. व्यावसायाच्या विकासा बरोबर सामाजिक जबाबदारी याचे समन्वय साधनाचे प्रतिभुती निर्माण करणे, धोरण आखण्यावर या संशोधन लेखात भर देण्यात आला आहे.

२. सिंगामनी पनिर आणि श्रध्दा माथुर, 'कॉर्पोरेट सोशर रिस्पॉन्सिबिलिटी इन इंडिया. अ रिव्हीव', (२०१६), या संशोधन पेपर मध्ये व्यवसायिक सामाजिक जबाबदारी मध्ये आरोग्याच्या बाबतीत मोठया प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे, लोकांच्या अर्थार्जनातून मोठा निधी हा केवळ आरोग्यावर खर्च होतो किंवा पैस्या अभावी अनारोग्यपुर्ण जिवन जगाव लागत आहे. व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या निधीच्या खर्चा बाबत पारदर्शकता असने आवश्यक आहे आणि सर्व भागधारकांना याची माहिती असने आवश्यक आहे.

३. नवेदिता स्वाइन, ''सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातिल व्यावसायिक सामाजिक दायित्व उपक्रमाची अंमलबजावनी आणि त्याच्या प्रगटिकरणाचा सरावचे तुलनात्मक अध्ययन'' (२०१६) या अभ्यासामध्ये सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातिल कंपन्या प्रदुषण कमी करण्याच्या धोरणचा अवलंब करतात. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातिल कंपण्या शिक्षणावरती भर देतात त्यात शिष्यवृत्ती आणि प्रायमरी, सेंकंडरी शिक्षण सुविधा उपलब्ध करून देतात. शाळा, महाविद्यालसाची बांधकामे करून देतात. आरोग्य शिबिर, फ्रिचेकप औषधी वाटप इत्यादी सुविधा उपलब्ध करून देतात. सामुदायिक विकासाकरिता सामुदायिक सभागृह, बहुउद्देशिय सभागृहाचे बांधकाम करून देतात. गुणवत्तापुर्ण जिवणाचे धडे समुदायाला देतात. या अभ्यासानुसार सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातिल कंपन्या व्यावसायिक सामाजिक दायित्वसाठी सामाजिक संस्थाना निधी देतात.

४. सिंगामनी पनिर आणि श्रध्दा माथुर, 'कॉर्पोरेट सोशर रिस्पॉन्सिबिलिटी इन इंडिया. अ रिव्हीव', (२०१६), या संशोधन पेपर मध्ये व्यवसायिक सामाजिक जबाबदारी मध्ये आरोग्याच्या बाबतीत मोठया प्रमाणात गुंतवणुकीची आवश्यकता आहे, लोकांच्या अर्थार्जनातून मोठा निधी हा केवळ आरोग्यावर खर्च होतो किंवा पैस्या अभावी अणारोग्यपुर्ण जिवन जगाव लागत आहे. व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या निधीच्या खर्चा बाबत पारदर्शकता असने आवश्यक आहे आणि सर्व भागधारकांना याची माहिती असने आवश्यक आहे, लाभार्थ्यांसाठी योजना तयार करित असतांना लाभार्थ्यांच्या गरजेवर आधारित असाव्या. आरोग्यासाठी मोठया गुंतवणुकीची शक्यता सिएसआर च्या माध्यमातुन आहे. भागधारकांना विश्वासात घेउन कार्यक्रमाची आखनी करणे आवश्यक आहे.

**अध्ययन पध्दती :**

**उद्देश :**

१. व्यवसायिक सामाजिक दायित्व उपक्रमाचे आयोग्यबाबतचे योगदाना अभ्यास करणे.

२. ग्रामिण आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**तथ्य संकलनाची साधने :**

**प्राथमिक साधन : मुलाखत अनुसूची**

**दुय्यम साधने :** विविध संशोधन लेख, मॅक्झीन लेख, वेबसाईटस् इत्यादी.

**अध्ययन क्षेत्र :** धारिवाल इन्फ्रास्टक्चर लिमिटेड आणि पहेल सोसायटी व्दारा व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या उपक्रमाच्या माध्यमातून राबवित येणाऱ्या आरोग्य उपक्रम. धारिवाल इन्फ्रास्टक्चर लिमिटेड आणि पहेल सोसायटी व्दारा व्यवसायिक सामाजिक दायित्व उपक्रमा अंतर्गत राबविण्यात आलेले उपक्रमाच्या सर्वेक्षणाचा अहवाल.

**१. आरोग्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम आणि आरोग्यपर जनजागृतीपर उपक्रमाचा आरोग्यपुर्ण जीवन जगण्याकडे झालेला बदल दर्शविणारी सारणी.**

| अ. क्र. | आरोग्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम | | आरोग्यपर जनजागृतीपर उपक्रमाचा आरोग्यपुर्ण जीवन जगण्याकडे झालेला बदल दर्शविला आहे | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्णत: सहमत | अंशत: सहमत | अनिश्चित/ सांगता येत नाही | अंशत:अ सहमत | पुर्णत: असहमत | |
| 1 | आरोग्य तपासणी | Count % of Total | 101<br>25.3% | 56<br>14.0% | 6<br>1.5% | 6<br>1.5% | 6<br>1.5% | 175<br>43.8% |
| 2 | आरोग्य चर्चा | Count % of Total | 39<br>9.8% | 28<br>7.0% | 9<br>2.3% | 8<br>2.0% | 12<br>3.0% | 96<br>24.0% |
| 3 | आरोग्य दिंडी | Count % of Total | 10<br>2.5% | 12<br>3.0% | 25<br>6.3% | 6<br>1.5% | 6<br>1.5% | 59<br>14.8% |
| 4 | आरोग्य माहिती पत्रकाची वाटणी | Count % of Total | 34<br>8.5% | 23<br>5.8% | 7<br>1.8% | 2<br>.5% | 4<br>1.0% | 70<br>17.5% |
| एकुण | | Count % of Total | 184<br>46.0% | 119<br>29.8% | 47<br>11.8% | 22<br>5.5% | 28<br>7.0% | 400<br>100.% |

(chi.squ 91.429a, df=12, cc=.431,N=400, P>0.05)

उपरोक्त सारणीच्या विश्लेषणावरून असे स्पष्ट होते की, आरोग्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम आणि याउपक्रमाचा आरोग्यपुर्ण जीवन जगण्याकडे झालेला बदलामध्ये धनात्मक संबंध आहे. आरोग्य जनजागृती कार्यक्रमात आरोग्य तपासणी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले या बाबत मत नोंदविणारे उत्तरदाते सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण ४३.८ टक्के आहे, त्या खालोखालआरोग्य जनजागृती कार्यक्रमा अंतर्गत आरोग्यबाबत चर्चा करण्यात आली या बाबत मत नोंदविणारे उत्तरदाते असून त्यांचे प्रमाण २४.० टक्के आहे. तर सर्वात कमी आरोग्य जनजागृती कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य आरोग्य माहिती पत्रकाची वाटणी करण्यात आली या बाबत मत नोंदविणारे उत्तरदाते असून त्यांचे प्रमाण १७.५ टक्के आहे. (chi.squ 91.429a, df=12, cc=.431,N=400, P>0.05) याचाच अर्थ आरोग्यासाठी राबविण्यात येणाऱ्या जनजागृतीपर उपक्रमाचा सामान्य जनतेच्या आरोग्यावर उत्तम परिणाम होतो. लोक जनजागृतीपर कार्यक्रमामुळे आरोग्या बाबत चर्चेत सहभागी होतात, आपसात चर्चा करीत असतात, पत्रके मिळाली तर वाचन करीत असतात. अनारोग्य टाळण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी उपाययोजना करणे, तपासणी करणे, लक्षणे ओळखणे इत्यादी बाबतीत जागृत असतात.

**२. आरोग्यासाठी ग्राम स्थरावरील कामे आणि सांडपाणी व्यवस्थापन, फवारणी, गटार दुरूस्ती, शोष खड्डा निर्मिती इत्यादी कामात उत्तरदात्यांचा प्रत्याक्ष किवा अप्रत्यक्ष सहभागाबाबत माहिती दर्शविणारी सारणी.**

| अ. क्र. | आरोग्यासाठी ग्राम स्तरावरील कामे | | सांडपाणी व्यवस्थापन, फवाारणी, गटार दुरूस्ती, शोष खड्डा निर्मिती इत्यादी कामात उत्तरदात्यांचा प्रत्याक्ष किवा अप्रत्यक्ष सहभागाबाबत माहिती. | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्णत: सहमत | अंशत: सहमत | अनिश्चित/ सांगता येत नाही | अंशत: असहमत | पुर्णत: असहमत | |
| 1 | सांडपाणी व्यवस्थापणासाठी प्रयत्न | Count % of Total | 40 10.0% | 39 9.8% | 10 2.5% | 4 1.0% | 13 3.3% | 106 26.5% |
| 2 | शोष खड्डे | Count % of Total | 10 2.5% | 15 3.8% | 0 .0% | 2 .5% | 7 1.8% | 34 8.5% |
| 3 | गटारे, नाल्यांची दुरूस्ती | Count % of Total | 4 1.0% | 23 5.8% | 8 2.0% | 1 .3% | 5 1.3% | 41 10.3% |
| 4 | नळ जोडणी, पाण्याच्या टाकी बांधण्यासाठी प्रयत्न | Count % of Total | 48 12.0% | 43 10.8 % | 8 2.0% | 5 1.3% | 6 1.5% | 110 27.5% |
| 5 | किटकनाशक फवारणी | Count % of Total | 69 17.3% | 18 4.5% | 10 2.5% | 7 1.8% | 5 1.3% | 109 27.3% |
| | एकुण | Count % of Total | 171 42.8% | 138 34.5 % | 36 9.0% | 19 4.8% | 36 9.0% | 400 100.0% |

(Chi-Squ- 61.368a, df=16, cc=0.365,N=400,P>0.05)

उपरोक्त सारणीवरून असे स्पष्ट होते की, आरोग्यासाठी ग्राम स्थरावरील कामे आणि उत्तरदात्यांचा प्रत्याक्ष किवा अप्रत्यक्ष सहभाग यामध्ये धन स्वरूपाचा संबंध आहे. आरोग्यासाठी ग्राम स्थरावर नळ जोडणी, पाण्याची टाकी बांधण्यासाठी प्रयत्न करण्यात आला असे मत नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण २७.५ टक्के आहे. त्या खालोखाल किटकनाशक फवारणी करण्यात आली असे मत नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या असून त्यांचे प्रमाण २७.३ टक्के आहे, सांडपाणी व्यवस्थापनासाठी प्रयत्न करण्यात येते असे मत नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण २६.५ टक्के आहे. तर सर्वात कमी आरोग्यासाठी ग्राम स्थरावर शोष खड्डे करण्यात आले असे मत नोंदविणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या असून त्यांचे प्रमाण ८.५ टक्के आहे. (Chi-Squ- 61.368a, df=16, cc=0.365,N=400,P>0.05) याचाच अर्थ असा की आरोग्यासाठी ग्राम स्तरावरील कामामध्ये उत्तरदात्यांचा सहभाग आवश्यक आहे. ग्राम स्तरावर आरोग्याचे नियोजन करतांना लोक सहभाग, जनजागृती याबाबींची आवश्यकता सातत्याने असते. साथरोग, विविध रोगथांब करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहे.

**मुख्य निष्कर्ष :**

१. व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या आरोग्य उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक उपक्रमांची अमंलबजावणी आवश्यक आहे.

२. आरोग्यपुर्ण जीवन जगण्यासाठी जनजागृती सतत होणे आवश्यक आहे. जनजागृतीची विविध माध्यमे आहेत, टि. व्ही., रेडिओ, माहिती पत्रके, प्रत्यक्ष लोकांशी चर्चा, आरोग्य दिंडी यामुळे जनजागृती होते.

३. आरोग्य जनजागृतीसाठी लोकसहभाग मिळविण्यासाठी सामाजिक संस्था आणि शासनाने एकत्र काम करण्याची आवश्यकता आहे. शासनाच्या विविध आरोग्य उपक्रमाला लोकसहभागाचा अभाव हा जनजागृती अभावी दिसून येतो. खाजगी आणि सरकारी सहभागाच्या आरोग्य जीवनाचे मॉडेल उभे करणे आवश्यक आहे.

४. वयोगटानूसार आरोग्य समस्यांचे वर्गिकरण करून आरोग्यासाठी उपचाराचे धोरण तयार करणे, शासन आणि उद्योगांचे एकत्र आरोग्यसाठी नियोजन असने आवश्यक आहे. जेनेकरून सर्वांसाठी आरोग्यपुर्ण जीवनाचे उद्दिष्ट गाठता येईल.

५. व्यवसायिक सामाजिक दायित्वाच्या आरोग्य उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय, गटारे, नळ योजना, साफसफाई, सांडपाणी व्यवस्थापन लोकसहभागातून राबविण्याची आवश्यकता आहे.
६. आरोग्य उपाययोजना बाबत जनजागृती, निर्णयात सहभाग, अमंलबजावणीत जनतेचा सहभाग, पारदर्शकता निर्माण करणे इत्यादी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
७. खाजगी संस्था, व्यवसायिक सामाजिक उपक्रम, गैरसरकारी संस्था याचा सहभाग, थर्ड पार्टी मुल्यमापन या बाबींचा अवलंबणकरून योजनेचा परिणामकता वाढविता येऊ शकतो.